नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०६/०४/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

## जबरी संभोग

**पो.स्टे. रामटेक :–** दिनांक २०/०८/२०२० चे १६:०० वा. ते दिनांक १९/०५/२०२१ चे १५.३० वा. पर्यंत पीडित/फिर्यादी वय १९ वर्ष व आरोपी नामे– सोलोमन श्रीनिवास चोलंगी वय २४ वर्ष, रा. कोदामेंढी, ता. मौदा हे एकमेकांना ओळखत असुन त्यांच्यात मागील एक वर्षापासुन प्रेमसंबंध होते. यातील आरोपीने पिडित/फिर्यादीस लग्नाचे आमिष दाखवुन तिचेसोबत वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले व पीडितेने आरोपीस लग्नाबाबत विचारणा केली असता, त्याने पीडितेस शिवीगाळ करून आजपावेतो लग्न करण्यास टाळाटाळ करित आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७६(२)(एन), ५०४ भादंवि. सहकलम ३(१)(आर)(एस)(डब्लु) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि सिमा बेंद्रे ९८२२९७३१५४ या करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. नरखेड :–** दिनांक २६/०३/२०२२ चे २२.३० वा. ते २३.०० वा. दरम्यान पीडित/फिर्यादी वय ३५ वर्ष हि आपल्या घरात लहान मुलीसह झोपली असतांना आरोपी नामे– एकनाथ बारसकर, वय ५६ वर्षे, रा. मोगरा ता. नरखेड याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (अ), ५०६ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रकाश खोपे मो.क्र. ९८८१५८२४७१ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. कन्हान :–** अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील एसबीआय बॅंकेसमोर हनुमान नगर कन्हान येथे दिनांक ०५/०४/२०२२ चे सकाळी ०८.४५ वा. ते ०९.०० वा. सुमारास अशोक रामकिशोर खंडेलवाल (मृतक), वय ६७ वर्ष, रा. हनुमान नगर, कन्हान हे त्यांची अॅक्टीव्हा गाडी क्र. एमएच– ४० यु– ९८३३ ने कन्हान स्टेट बॅंककडुन सुरेश नगर, कन्हान कडे जाण्याकरीता रोड क्रॉस करीत असतांना शिवनी कडुन कन्हान कडे येणाऱ्या नविन विना नंबर प्लेट चे टु व्हीलर बाईक चालक आरोपी नामे– रविंद्र माहुलाल मडावी रा. काचना ग्राम काचना तह. बरघाट जिल्हा शिवनी याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन अॅक्टीव्हा चालकाला जोरधार धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी केल्याने सदर अशोक खंडेलवाल हे उपचारा दरम्यान मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विजय बाबुलालजी खंडेलवाल रा. तारसा रोड कन्हान यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा

नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी जखमी असल्याने अटक नाही. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री सुरजुसे हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत २१ कि.मी. अंतरावरील मौजा डोरली शिवार राउळगाव डांबरी रोडवर विजेच्या टॉवर जवळ येथे दिनांक ०५/०४/२०२२ चे १९.०० वा. ते १९.३० वा. सुमारास फिर्यादीचे काका हे त्यांचे मालक मनोज वसु रा. कोतवाल बर्डी यांची एमएच— ४०/एए —९४१५ क्रमांकाच्या स्प्लेंडर मोटरसायकल ने काटोल येथुन आपले गावी राउळगाव येथे परत येत होते. त्यादरम्यान एमएच— ३१/झेड— २७५८ क्रमांकाचा ट्रॅक्टरचा चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे काका दिपक श्रावण बनसोड वय ४० वर्ष रा. राउळगाव यांच्या मोटरसायकला समोरून विरूध्द दिशेने जोरदार धडक दिली. या अपघातात दिपक बनसोड हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचाराकामी शासकीय रूग्णालय कळमेश्वर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मोहन रमेशराव बनसोड वय २९ वर्ष, रा. डोरली ता. काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री शरद गायकवाड मो.नं. ९९२३९८८२९२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**